<u>महाराष्ट्र वैद्यकीय व  आरोग्य सेवा  वैद्यकीय अधिकारी गट-अ (एस-२०) पदभरती २०२४</u>

## एमबीबीएस (MBBS) उमेदवारांसाठी  प्रसिध्दी  पत्रक

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी (एस-२०)  (एमबीबीएस) जाहिरात दि.३१.०१.२०२४ मधील १४४६ पैकी रिक्त असलेल्या पदांवर  प्रतिक्षाधीन यादीतील उमेदवारांसाठी दि.२१.०४.२०२५, दि.२३.०४.२०२५, दि.२५.०४.२०२५ दि.२८.०४.२०२५ व दि.०२.०५.२०२५ रोजीचे समुपदेशन प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. सदर समुदपदेशन प्रकियेबाबत माहिती खालीलप्रमाणे -

१. सन २०२४ च्या वैद्यकीय अधिकारी गट-अ पदभरतीतील प्रतिक्षाधीन यादीतील उमेदवारांना दि.२१.०४.२०२५, दि.२३.०४.२०२५ व दि.२५.०४.२०२५ या तीन दिवसामध्ये समुपदेशनासाठी आरोग्य भवन, मुंबई येथे बोलाविण्यात येईल.
२. पहिल्या दिवशी तज्ञ संवर्गातील उमेदवारांना समुपदेशनासाठी बोलविण्यात येईल.
३. दि.२३.०४.२०२५ व दि.२५.०४.२०२५ या दिवशी एमबीबीएस उमेदवारांना समुपदेशनासाठी बोलविण्यात येईल.
४. एकूण ३०७ रिक्त पदांसाठी (सदर आकडा वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही) एकास पाच याप्रमाणे उमेदवारांना समुपदेशन प्रक्रियेसाठी बोलविण्यात येत आहे. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी
५. दि.२८.०४.२०२५ रोजी सन २०२४-२५ मधील पहिल्या, दुस-या व तिस-या फेरीमध्ये जे उमेदवार कागदपत्र पडताळणी साठी उपसंचालक कार्यालयात अनुपस्थित होते, अशा उमेदवारांना समुपदेशनासाठी प्रवर्गनिहाय रिक्त पदांचा विचार करुन रिक्त पदांच्या १:५ या प्रमाणात समुपदेशनासाठी बोलविण्यात येत आहे, यास्तव बोलविण्यात आलेल्या सर्वच उमेदवारांची निवड होईलच असे गृहीत धरु नये.
६. कागदपत्र पडताळणी ही समुपदेशनाच्याच दिवशी करण्यात येणार असून उमेदवारांने ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत तसेच अपलोड केलेली सर्व मूळ कागदपत्रे व त्यांचा प्रत्येकी १ साक्षांकीत केलेली छायांकीत प्रत, १ पासपोर्ट साईज फोटो, व मुळ आधारकार्ड  समुपदेशनाच्या वेळी सोबत आणणे अनिवार्य आहे.
७. उमेदवारांनी ते सार्वजनिक आरोग्य विभागातील कुठल्याही पदावर कार्यरत नसलेबाबत त्यांना शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.
८. पदव्युत्तर पदवी/ पदविका धारक उमेदवार यांना जर एमबीबीएस पदावर पदस्थापना घ्यावयाची असल्यास, त्यांना तशी मुभा देण्यात येईल. त्यांना एमबीबीएस पदावर त्यांच्या एमबीबीएस च्या गुणवत्ता यादी मधील गुणवत्ता क्रमांकानुसार समुपदेशनासाठी बोलविण्यात येईल, तथापि एम.बी.बी.एस. च्या गुणवत्तेनुसार उमेदवारांस पदस्थापना न मिळाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.
९. समुपदेशन प्रक्रियेनंतर दररोज विभागातील रिक्त पदे संकेतस्थळावर अद्ययावत करण्यात येतील.
१०.समुपदेशनाबाबत ज्या उमेदवारांना ई-मेल व दूरध्वनी प्राप्त होतील अशाच उमेदवारांनी ई-मेलमध्ये नमुद केलेल्या दिनांकास समुपदेशन प्रक्रियेसाठी उपस्थित रहावे, अन्य उमेदवारांनी उपस्थित राहू नये. त्यांचा विचार केला जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
११.प्रवर्गनिहाय रिक्त जागांची माहिती प्रसिद्ध केली जाईल. सदर माहिती पाहूनच आपल्या प्रवर्गाची जागा रिक्त रिक्त आहे किंवा कसे याबाबतची खातरजमा करून घ्यावी. तसेच सदर प्रक्रियेसाठी उपस्थित राहण्याकरिता उमेदवारांना कोणत्याही प्रकारचे प्रवास भत्ता अथवा इतर भत्ता देण्यात येणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

-------------------------------